# एकविसाव्या शतकातील कामगार विश्व आणि कामगार साहित्य

**डॉ. बळवंत भोयर**
*ज्येष्ठ साहित्यीक व संशोधक*

भारत संपूर्ण जगात महाशक्ती राष्ट्र म्हणून उदयास येत आहे. शंभर कोटीपेक्षा जास्त लोकसंख्या असलेला भारत एक विशाल देश आहे. त्याती 40 टक्के लोकसंख्या आर्थिकदृष्टया सबळ आहे. त्यांची क्रयक्षमता अमेरिका व युरोपच्या लोकसंख्येबरोबर आहे. त्यामुळे अमेरिका, युरोप व विकसित देश भारताला फार मोठी उपभोक्ता बाजारपेठ समजतात. त्या मानाने संपन्न देशांत बाजारपेठेतील मागणी जवळपास संपत आली आहे. समृध्द उपभोक्त्यांच्या आवश्यकतांचा पुरवठा करण्यासाठी उत्पादनक्षमता आहे. परंतु तयार वस्तुंना खरेदीदार नाहीत. तिथे मंदीचे सावट परसले आहे. भारत विकासोन्मुख राष्ट्र असल्यामुळे समृध्द उपभोक्तांच्या मागणीनुसार पुरवठा करण्यासाठी औद्योगिक विकासाची प्रचंड प्रमाणात मागणी केली जात आहे. भांडवलाची कमतरता नाही, श्रमाची कमतरता नाही, तरी पण बेरोजगारांची फौज कां आहे? एम.आ.डी.सी. क्षेत्रातील कारखाने आजारी कां होत आहेत? कामगारांमध्ये निराशेचे वातावरण कां निर्माण झाले आहे?

ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेता, औद्योगिक विकासाची क्रांती युरोप व अमेरिकेत झाली. परंतु भारतात औद्योगिकरणानंतर समाजाचा यथोचित विकास झाला नाही. विदेशांद्वारे केले गेलेले औद्योगिकरण 'एकांगी' होते. कच्च्या मालाचा उत्पादनासाठी उपयोग न करता, बाजारात विकला जात होता. परंतु भांडवलाचा उपयोग विकाराच्या मुलभूत संरचनेत न करता, बाजारात विकला जात होता. परंतु भांडवलाचा उपयोग विकासाच्या मुलभूत संरचनेत न करता, या देशांनी स्वतःच्या देशात विकासासाठी केला. त्यामुळे भारतात औद्योगिकरणाचे सकारात्मक परिणाम जाणवले नाहीत. औद्योगिक क्रांतीचे सकारात्मक परिणाम युरोपमध्ये मिळालेत.

भारतात 75 वर्षाच्या स्वातंत्र्यानंतर फार मोठया प्रमाणात उपभोक्ता वर्ग निर्माण झाला आहे. भारताची गरिबी व बेरोजगारी पूर्णपणे संपविण्याची क्षमता भारताजवळ आहे. क्षमतेचा पूर्ण उपयोग जीवनस्तर सुधारण्यासाठी केला. बहुराष्ट्रीय कंपन्या युनिलिवर, पेप्सी इत्यादी भारतीय उपभोक्तांना आकर्शित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्याचा भारतीय श्रमिकांना उपयोग होत नाही. भांडवलशाहीत बरेच दोष असले तरी भांडवल निर्माण केल्यामुळेच राष्ट्राची आधारभूत संरचना मजबूत होईल व जनतेचा जीवनस्तर वाढेल. आज उत्पादनाच्या क्षेत्रात ज्या बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत. त्या भारतीय जीवन समृध्द करण्यासाठी किती प्रयत्न करतात? उपभोक्तावादाच्या दबावतंत्रात भारत ओढला जात आहे. उपभोक्त्यांना स्वस्त व गुणवत्तेच्या आधारावर बहुराष्ट्रीय कंपन्या भारतीय कंपन्यांना स्पर्धेत टिकू देत नाहीत. उपभोक्तावाद कोणत्या किमतीवर आधारित आहे? नीती निर्धारित करताना रोजगार दरात वाढ झाली आहे काय? अन्न, निवारा व स्वास्थ या संबंधात मूलभुत सोयी नागरिकांना देऊ शकत नाही. घटनेच्या मूलभूत अधिकारात व नीती निर्दिष्ट सिध्दांतानुसार स्पष्ट केल्याप्रमाणे ''भारतात कल्याणकारी राज्याच्या स्वरूपात जीवनस्तर वाढविण्यासाठी नीती निर्धारित केली जाईल काय! आज उपभोक्तावादानुसार स्वस्त मोटार, कार, स्वस्त दारू, फॅशनच्या वस्तू, विदेशी उपकरणांसाठी भारतीय श्रमसंपदेला वेठीस धरल्या जात नाही काय? भारतातील युवा पिढीला असमानता व संधी उपलब्ध नसल्यामुळे असामाजिक कार्याकडे वळत आहे. नवीन आर्थिक तंत्र एकविसाव्या शतकाची देण आहे. त्यातून नवीन तंत्र व नवीन बाजार व्यवस्था उदयास येत आहे. भारतातील परंपरागत श्रमिक याचा फायदा कितपत घेऊ शकतील? या आव्हानांना भारतात श्रमिक आंदोलन कशा रीतीने समोर जाईल. हाच मूलभूत प्रश्न आहे.

**कामगार संघटनांची भूमिका :**

भारतात प्रारंभिक औद्योगिकरण इंग्रजी राज्यसत्तेच्या आवश्यकतेनुसार झाले. डाक–तार व रेल्वेमध्ये कामगार आंदोलनाची मुळे पक्की रोवल्या गेलीत. कापड उदयोग, परिवहन क्षेत्र व खाण उदयोग यात कामगारांची स्थिस्ती सुधारण्यासाठी महत्वाची भूमिका पार पाडली. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने श्रमिक संघाना विशेष प्रोत्साहन दिले. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या विकासाकरिता सरकारीकरणाला प्रोत्साहन दिले व खाजगी उद्योगावर नियंत्रण प्रस्थापित केले होते. आदर्श कल्याणकारी राज्याची कल्पना साकारण्यासाठी वेतनवृध्दी, वेतन आयोग, स्वास्थ विमा योजना, भविष्य निधी, घर बांधणी योजना, बोनस इत्यादी अनेक सोयीसवलती दिल्यात. परंतु सध्या सरकारी नीती बदलल्यामुळे सार्वजनिक क्षेत्र खाजगी क्षेत्राकडे वळविले जात आहे. सार्वजनिक क्षेत्रातील कामगारांना कमी केल्या जात आहे.

**बाजारवाद एक आव्हान :**

उपभोक्तावर्ग व भांडवलवादाची प्रवृत्ती एकसारखी आहे. सरकारी घाटा सुध्दा तात्कालीन स्वरूपात कमी होऊ शकतो काय? खाजगी व बहुराष्ट्रीय कंपन्यांनी केवळ आपल्या फायद्याचाच विचार करावा? ''अमेरिकेत ठेवा किंवा काढा'' या नीतीचा अवलंब करतात. तशीच सुरूवात भारतात सुरू झाली आहे. कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने काम देणे, काम संपले की काढून टाकणे, ही व्यवस्था काही लोकांसाठी लाभदायक आहे. अमेरिकेसारख्या देशात पुरेशी संसाधने आहेत व सीमित मानव संपत्ती आहे. तिथे ती उपयुक्त आहे. परंतु भारतासारख्या देशात जर मानव श्रमाचे मूल्य बाजारातील उपलब्धतेनुसार दिल्या जाते, तिथे

शोषणाचा नवीन प्रकार उदयाला आले आहे. अशी स्थिती असंघटित श्रमिकांची आहे. जीवनस्तर सारखा खालावत आहे. हीच बिमारी संघटित क्षेत्राला लागली आहे. काही लोक लक्षावधी श्रमिकांना वेठीस धरून श्रीमंत होतील, लक्षावधी कामगार दारिद्रयात खितपत पडतील. रोजगार अनियमित होईल. वेतन कमी होईल. 1930 ते 35 च्या दरम्यान वेतन कपात मोठया प्रमाणात केली होती? तशीच स्थिती भारतात सध्या निर्माण झाली आहे. समस्या सोडविणे स्थानीय स्वरूपात नसून बाजार आधारित विश्व व्यवस्थेमुळे स्थानीय व राजनैतिक दबाव नष्ट झाला आहे. दक्षिण आशियातील देश कोरिया, इंडोनेशिया, तायवान इत्यादी देशातील मंदीमुळे अमेरिकी डॉलर वधारला. 21 व्या शतकात आर्थिक परिस्थिती अधिक बिकट झालेले आहे. संघटित क्षेत्रातील सोयी व लाभाची स्थिती समाप्त होऊ शकते व असंघटित क्षेत्रातील स्थिती विषम होऊ शकते अनेक राजनैतिक प्रभावशाली वर्गांच्या दबावामुळे सरकारी नीती प्रभावित होऊ भाकते.

उपभोक्ता, मध्यम वर्ग, भांडवलदार, नोकरशाहा, मोठे व्यापारी समूह, बहुराष्ट्रीय कंपन्या व आंतरराष्ट्रीय दबावामुळे कामगार भरडला जाऊ शकतो. त्यासाठी कामगारांनी याचा संघटितपणे मुकाबला करायला हवा. असंघटित क्षेत्राकडे अधिक लक्ष द्यावे.

कामगार संघटनांनी असंघटित क्षेत्राकडे अधिक लक्ष देऊन त्यांना अन्न, वस्त्र, निवारा, स्वास्थ्य, कुटुंब कल्याण, शिक्षण, मनोरंजन व सामुदायिक विकासासाठी वेतन दर निर्धारित करणे आवश्यक आहे. वेतनाचे अनुपात 5 पटीपेक्षा जास्त नसावे. सरकार जर आपल्या कल्याणकारी राज्याच्या भूमिकेपासून हटत असेल, तर कामगार संघटनांनी सरकारला समजावून सांगण्याची आवश्यकता आहे. बेरोजगारी व गरिबी वाढणे लोकशाहीला घातक आहे. समाजाचे स्थायित्व संपेल, कायद्याचे राज्य जाऊन विषयमतेची स्थिती निर्माण होईल. याकडे लक्ष दिले नाही गेले नाही तर 'जंगल राज' निर्माण होईल.

आपले व्यावसायिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व कर्मचारी, कामगारांनी सामूहिक प्रयत्न करणे आव यक आहे. उद्योगाची लाभस्थिती निर्माण होईल, असा प्रयत्न करावा, नाही तर हानी झाल्यास कामगारांची कपात, स्वेच्छानिवृत्ती योजना समोर येईल म्हणून उत्पादकता वाढविण्याचा प्रयत्न कामगारांनी करावा. कामगार संघटनांनी जनजागरण करून, असंघटित क्षेत्रातील कामगार, बाल श्रमिक, महिला, श्रमिकांना संघटित करून प्रयत्न करणे आवश्यक आहे.

1. रोजगाराला मूलभूत अधिकाराचा दर्जा दिला जावा.
2. रोजगाराभिमुख नीतीला सर्वोच्च प्राधान्य द्यावे.
3. प्रत्येक प्रतिष्ठानात रजिस्ट्रेशनसोबत कामगार हिताकडे लक्ष पुरविणारी स्वतंत्र निरीक्षण पद्धती असावी.
4. निवारा, स्वास्थ्य व शिक्षणाच्या योजनांसाठी परिव्यय प्रतिशत निश्चित करावे ते वेतनाशी संलग्न नसावे.
5. सामुदायिक विकासाकरिता अनिवार्य ढाचा विकसित करणे प्रत्येक प्रतिष्ठानाला आव यक आहे.
6. वेतन अनुपात 5 टक्क्यांपेक्ष जास्त नसावे.
7. आजीवन रोजगारांसाठी तसेच मोसमी रोजगांरासाठी रोजगार विमा सुरू केला जावा, औद्योगिक आजारपण व उद्योग बंद झाल्यानंतर कामगारांच्या हिताचे सरंक्षण करण्यात यावे.
8. उपभोक्ता क्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपन्याच्या एकाधिकाराला रोखण्यासाठी कायदा बनविण्यात यावा.
9. कॉन्ट्रॅक्ट पध्दतीनुसार तथा अनियमित श्रमिकांसाठी निवारा, स्वास्थ, शिक्षण, विमा सवलती द्याव्यात.
10. श्रमिक संघटनांचा एक पूर्ण अधिकार संपन्न आयोग असावा. त्याद्वारे कार्यस्थिती, वेतन, भत्ते, नियम यांचे पालन व अनियमितता असेल तर प्रतिष्ठानाला दंड करण्यात यावा.
11. मालकांना आर्थिक अपराधासाठी कठोर दंड असावा. त्यामुळे आर्थिक अनियमिततेवर पायबंद बसेल.
12. कामगार वर्गात जागृती निर्माण करून त्यांचे अधिकार व कर्तव्यसंबंधी सतत जाणीव निर्माण करून सतत संपर्क प्रस्थापित करावा, त्यासाठी सरकारला सक्षम सहकार्य करावे.

**भारतीय श्रमव्यवस्थेने घ्यावा जपानचा आदर्श :**

जपानमधीन कामगार सक्षम संहकार्य, सामंजस्य व तांत्रिक स्पर्धा यांच्या आधारावर जगातल्या उच्चतम औद्योगिक राष्ट्रांशी मुकाबला करीत आहे, तिथे खाजगी क्षेत्र मोठया प्रमाणात आहे. श्रमिक वर्गातील निराशा दूर करण्यासाठी सामाजिक सुरक्षेच्या तंत्राला प्राधान्य देणे गरजेचे आहे. भारताची आर्थिक नीती भारतातील मानवी संपत्ती विचारात घेऊन ठरवावयास हवी. तात्कालीन लाभाचे गणित व आंतरराष्ट्रीय दबाव याचा विचार करावयास हवा. कामगार हित व आंतराष्ट्रीय विनियोजनामध्ये सतर्कता ठेवली, तर भारताचा विशाल मध्यमवर्ग व भांडवलदार आर्थिक विकासाचा उच्च दर निर्माण करू शकतात. त्यासाठी नकारात्मक कामगार आंदोलन, शूद्र राजकीय उद्दिष्टये यापासून सावधानता बाळगावयास हवी. तरच एकविसाव्या शतकात कामगार आंदोलन योग्य दिशा देऊ शकेल.

यापुर्वी आपण एकविसाव्या शतकातील कामागार विश्व यावर सविस्तर विवेचन मांडले. या कामगार विश्वानेच कामगार साहित्यांची निर्मिती केली. हे तेवढेच महत्वाचे आहे.

**कामगार साहित्य :**

कामगार हे यंत्रनिष्ठ, उद्योगप्रधान अशा आधुनिक युगाचं आणि संस्कृतीचं अपत्य आहे. या आधुनिक युगाना 'यंत्रयुगं' असेही म्हणतात. अठराव्या शतकापासून जगाच्या पाठीवर यंत्रयुगाला प्रारंभ झाला. असं मानलं जातं की जिथं यंत्र आहे तिथं कामगार हा आहेच. जिथं माय आहे तिथं लेकरू असतं. नि झाड आहे तिथं पाखरू हे असतंच. असंच माय लेकराचं नात यंत्राच नि कामगारांच आहे. प्रत्यक्ष मी कामगार साहित्यिक असल्यामुळे स्वतः श्रमाचं महत्व जाणतो. पाश्चात्य देशात श्रमाला अधिक महत्व दिल्या जाते. परंतु आपल्या दशात श्रम, श्रमिकांना कमी लेखले जाते. श्रमाला महत्व दिले जात नाही. त्यामुळे

कामगारांचा खऱ्या अर्थाने योग्य प्रतिसादा अभावी बौद्धीक सामाजिक, आर्थिक विकास होत नाही. पदोपदी कामगारांचे शोषण होत चालले आहे. हे फार मोठं दुःख आहे.

मित्रहो, कामगारांच्या जीवनाची स्थूलरेशा आणि तिचं स्वरूप एवढयासाठीच सांगितले पाहिजे की, कामगाराला आपण कोण आहोत, याचं भान याव आपण कोण आहोत याची जाणीव नीटपणे झाली की, आपल्या विकासाच्या वाटा आपणाला स्पष्ट दिसू लागतात. कामगारांच्या विकासाच्या वाटा कारखानदारीच्या घनदाट जंगलातून जात नसून आत्मभान आलेल्या आणि आत्मविकासाचा ध्यास असलेल्या कामगारांच्या उद्यानातूनच हया उगवत असतात. आत्मविकासासाठी संघर्ष आपल्यातील सखोल विचारांचा उथळ वासनांशी असतो. विवेकाचा वासनांशी असतो. उदात्त बुद्धीचा क्षुद्र मोहाशी असतो. नव्या आधुनिक मूल्यांचा जुन्या कालबाहय झालेल्या मूल्यांशी असतो. माणुसकीचा पशुत्वाशी असतो. हा रोज चाललेला संघर्ष असतो. इथं टाळेबंदी नसते इथं कामाचे ठराविक तास नसतात. हा संघर्ष जगतगुरू संत तुकारामांच्या भाशेत बोलायचं झाल्यास 'रात्रंदिन सतत चाललेला असतो' आणि तो युद्धपातळीवरचा असतो ज्याला हा संघर्ष करता येतो तो 'गुणवंत कामगार' होऊ शकतो तोच उत्तम खेळाडू होऊ शकतो त्यालाच साहित्याचं केलेलं वाचन कळू भाकते एवढेचं नव्हेतर तोच खऱ्या अर्थाने साहित्यिकही होऊ शकतो. त्याने एकच करावे स्वतःचा आत्मशोध घ्यावा व स्वअस्मितेसह जागृत रहावे.

साहित्यातील एखाद्या प्रवाहाचा आपण जेव्हा जाणीवपूर्वक विचार करतो, तेव्हा त्याच्याशी निगडीत असलेली संकल्पना, तिची व्याप्ती आणि मर्यादा लक्षात घेतली पाहिजे. 1960 नंतर ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, जनवादी साहित्य, आदिवासी साहित्य, मुस्लीम साहित्य इत्यादी प्रवाह आपले स्वतंत्र अथवा पृथक अस्तित्व जाणीवपूर्वक मानू लागले. तेव्हा ग्रामीण साहित्य म्हणजे काय? दलित साहित्य म्हणजे काय? स्त्रीवादी साहित्य म्हणजे काय? इत्यादी प्रश्नांची चिकित्सा होऊ लागली आणि ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य इत्यादी संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न होऊ लागला.

गेल्या काही वर्षात विषेशतः प्रतिवर्षी कामगार साहित्य संमेलने नियमित भरू लागली आणि संमेलनाचा एक भाग म्हणून कामगार साहितियकांसाठी कु ाल अ या कथा, कादंबऱ्या, नाटय, कविता यांच्या कार्यशाळा आयोजित केल्या जाऊ लागल्या तेव्हा पासून 'कामगार साहित्या' चा स्वतंत्रपणे विचार करण्याची निकड भासू लागली आणि कामगार साहित्य म्हणजे नेमकं काय? या प्रश्नांच्या अनुशंगाने या साहित्याची संकल्पना मांडण्याचा प्रयत्न होऊ लागला आणि म्हणूनच कामगार साहित्य म्हणजे काय? त्याची संस्कृती म्हणजे काय? असा एक कुतुहलाचा प्रश्न सर्वांच्या मनात डोकावत असणारच. असा प्रश्न उपस्थित होणे साहजिकच आहे. आजच्या भारतीय साहित्यात किंवा मराठी साहित्यात अनुपस्थित असलेले, दबलेले, वंचित राहिलेले सर्व सामाजिक थर शिक्षणाच्या व स्वअस्मितेच्या रूपाने वेगाने उपस्थित होताहोत. आणि संस्कृती, साहित्य किंवा शैक्षणिक केंद्रस्थानी स्वतःचे जीवन त्यातील ताणतणाव, स्वतःची भाषा व अभिव्यक्ती आपापल्या स्थानी दबून राहिलेली मौखिक परंपरा आणि कला यांचा मनोज्ञआविष्कार घडवीत आहेत. हा इतिहासानेच घडविलेला अपूर्व बदल आहे. कामगार साहित्य ही त्यातीलच एक महत्वाचे किंबहुना समाजातील सर्वच थरांना एकवटून मुखरित होणारे साहित्य राहणार आहे. ते एकूण मराठीच्या सर्व प्रवाहासोबत वाढणारे हया प्रवाहाची कक्षा अधिक रूंद करणारे, स्वअस्मितेसह सर्वच प्रागतिक परंपरांना डोळसपणा देत विकसित होत जाणारे साहित्य असेल. हया साहित्याचा श्रम हा केंद्रबिंदू आहे. श्रमच दुसरी सृष्टी निर्माण करतात समाजातील सर्वच कष्टकरी वर्गाचा सहभाग असतो. यात शास्त्रज्ञ व कलावंताचाही मोठा सहभाग असतो. मानवी बुध्दी व त्याचे त्या कारणी लागणारे श्रम वेगळी सृष्टी निर्माण करतात. एवढेच नव्हे तर त्याद्वारा ते भौतिक बदलही घडवितात. एक वेगळी संस्कृती निर्माण करतात व त्या अनुषंगाने समग्र मानव जातीच्या वैचारिक बदलात तिच्या जगण्या वागण्यात लाक्षणिक बदल घडवून आणतात. मानव जातीच्या मागील पिढयांचा त्याच्या आचारविचारांचा व त्यांच्या सर्व बदलांचा इतिहास हेच सांगतो.

कामगार साहित्याच्या संदर्भात दोन प्रश्न उपस्थित होतात. कामगाराविषयी अथवा त्यांच्या जीवनाविषयी त्यांच्या सुख दुःख विषयी लिहिलेले वाङ्मय अथवा कामागारांनी कामगारांविषयी लिहिलेले साहित्य की कामगाराने लिहिलेले कोणतेही साहित्य कामगार साहित्य म्हणायचे. हा प्रश्न दलित साहित्याच्या संदर्भातही विचारला गेला होता. कामगारांच्या जीवनावर तसे उल्लेखनीय साहित्य मराठीत लिहिले गेले आहे. केशवसुतांनी 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' ही कविता लिहून सामाजिक विषमतेला पहिला उद्‌गार दिला. म्हणून वस्तुतः ती मराठीतील पहिली विद्रोही कविता आहे. तिचे नाते दलित कवितेतील वेदनेशी जुळणारे आहे आणि केशवसुतांची 'मजुरांवर उपासमारीची पाळी' या कवितेत आर्थिक विषमतेचा पहिला उद्‌गार आहे. श्रमिकांविषयीची ती पहिली कविता आहे. श्रम करणाऱ्या शोषितांची ती वेदना आहे. परंतु केशवसुतांना जसे कोणी दलित कवी म्हणत नाही तसेच त्यांना कोणी शोषित कवी ही म्हणत नाही. कारण केशवसुतांनी या कविता दलिताविषयीच्या व श्रमिकाविषयीच्या सहानुभुतीतून समाज सुधारणावादी, उदामतवादी, मानवतावादी दृष्टिकोनातून लिहिलेल्या आहेत.

दामोदर हॉलने त्या काळात गिरण गावातील रंगभूमी हे नाव प्रचलित केले. आणि ही नाटके गिरणी कामगार कलावंतानी रंगभूमीवर आणली. म्हणून कामगार रंगभूमी अस्तित्वात आली. मध्यमवर्गियांच्या मराठी रंगभूमीला मो. ग. रांगणेकरांच्या कौटुबिक नाटकांनी जगवले. परंतु त्या काळातील नाटके आशयाच्या दृष्टीने विचारात घेतली. तर कामगारावर्गीय आहेत. असे म्हणता येईल को? तर

कामगारांचे जीवनानुभव हाही कामगार साहित्याचा अविभाज्य घटक मानायला हवा.

'कामगार' या वर्ग संकल्पनेला विशेष महत्व येऊ लागले ते मजूर चळवळीमुळे साहित्य हे कालसापेक्ष असते. त्या–त्या काळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक घटनांचे परिवर्तन साहित्यात होतच असते. कामगारांच्या हितसंबंधांशी निगडीत असणाऱ्या मजूर चळवळीचे परिवर्तन मराठी कादंबरीतही झालेले दिसते.

कामागारांच्या जीवनाशी साम्यवादी तत्वज्ञान आणि मजूर चळवळ निगडीत झाली आणि त्याचे चित्रण करणारे, दर्शन घडविणारे साहित्य हे कामगार सहित्य मानले गेले. ही फारच सिमित संकल्पना आहे. कारण मजुरांच्या आर्थिक राजकारणापलिकडे ही कामगारांच्या जीवनाचे वास्तव असते. त्याचे तितकेच वास्तवपूर्ण दर्शन असते. त्याचे तितकेच वास्तवपूर्ण दर्शन कामागार साहित्यातून घडले पाहिजे. मराठीतील नाटके, कथा, कविता यांची अवस्था ही थोडीफार अशीच आहे. म्हणजे हे साहित्यही प्रसंगोपात मार्क्सवादाच्या, साम्यवादाच्या प्रभावाखाली आले आणि त्यातील काही प्रमेयांचा पुरस्कार कवींनी केला. उदा. भांडवलदारांकडून श्रमिकांचे होणारे शोषण, शोषणमुक्तीसाठी वर्गसंघर्षाची अटळता आणि वर्गसंघर्षाची श्रमिकांची जागृत होणारी संघशक्ती इत्यादी विषयी जाणिवा कधी प्रत्यक्ष रूपात प्रतिकातून तर कधी रूपकातून कवी अनिल, कुसुमाग्रज, मुक्तिबोध यांच्या कवितातून व्यक्त झालेल्या होत्या. पण कामगार कवी म्हणून उल्लेख होतो तो नारायण सुर्वे यांचा, मामा वरेरकारांचा बाबा शिगवण विचाराने, मनाने, जन्माने आणि व्यवसायाने कामगार होता तसेच सुर्वे जन्माने, मनाने, विचाराने, वृत्ती प्रवृत्तीने कामगार आहेत.

मार्क्सवादाच्या बौध्दिक चर्चेच्या पातळीवर ते राहिले नाहित. ते तत्वज्ञान त्यांच्या व्यक्तिमत्वात भिनले. कृती उक्तीत झिरपले आणि उत्स्फूर्तपणे त्यांच्या कवितातून प्रकट झाले. 'कामगार आहे मी तळपती तलवार आहे' या त्यांच्या उद्‌गारात श्रमिकांच्या शोषणाचे भान आणि वर्गसंघर्षासाठी त्यांच्यात निर्माण झालेला आत्मविश्वास एकाच वेळी प्रकट होतो. म्हणून त्यांच्या कवितातून कामागारांच्या शोषित जीवनाचे खरे वास्तव चित्रण येते आणि वर्गसघर्षाचा 'जाहिरनामा' येतो. हे खरे असले तरी सुर्व्यांची कविता ही कामगार कविता आहे असे म्हटले जाते. तेव्हा ती मार्क्सवादी साम्यवादी कविता आहे असे सुचित होते आणि कामगार साहित्य म्हणजे 'मार्क्सवादी साहित्य' हे समीकरण अधोरेखीत होते आणि श्रमाची प्रतिष्ठा मार्क्सवादातील एक प्रमेय आहे असे मानले तर श्रमाचा गौरव करणारी कविताही गैरसमजूतीने 'श्रमिक कविता' मानावी लागेल. आणि त्या कवितेला मार्क्सवादाची, साम्यवादाची डूब द्यावी लागेल. उदा. मंगेश पाडगावकरांची 'हात हवे मज' ही कविता एका मानवी आदर्शवादाच्या प्रेरणेतून लिहिलेली आहे. पण हाताचा संबंध श्रमाशी आहे. आणि मला कष्टकऱ्यांचे हात हवेत अशी संवदेना प्रकट करते. यातूनच असे स्पष्ट होते की, कामगारांच्या जीवनानुभवाचे त्यांच्या संवदेनाचे, जाणिवांचे दर्शन घडविणारे साहित्य म्हणजे कामगार साहित्य.

1930 च्या सुमारास साम्यवादी विचारांचे नियंत्रण असणाऱ्या मंजूर चळवळींनी मुंबई प्रभावित झाली होती. प्रसंगोपात वा.म.जोशी यांच्या सुशीलेचा ठेवा' या कांदबरीत त्याचे पडसाद आहेत. सुशीलेची मते ही विशेषतः विवाह विषयक मते पुरोगामी आहेत आणि बोल्शेविकांच्या विचारांचा प्रभाव आहे हे तिने मान्य केले आणि या कादंबरीतील काही पात्रांच्या मुखातून लेखकाने साम्यवादी तत्वांची काही चर्चाही केली. पण तेवढयावरून ही कादंबरी साम्यवादी आहे असे म्हणण्यात गफलत होते.

कामगारांचा संबंध मंजुर चळवळीशी आहे आणि वर्ग संघर्ष हे साम्यवादाचे प्रमेय आहे. मामा वरेरकरांच्या 'धावता धोटा' (1933) या कादंबरीची संपूर्ण बैठकच मजुरांच्या आर्थिक राजकारणाची आहे आणि अशी ही पहिलीच कादंबरी आहे. मजूर पुढाऱ्याचे एक लढाऊ व्यक्तिमत्व बाबा शिगवणच्या रूपाने वरेरकरांनी निर्माण केले. हे मराठीतील एक अपूर्व मॉडेल होते. पण त्यांच्या प्रतिकृती पुढे वरेरकरांनाही निर्माण करता आल्या नाहीत. कामगारांमधूनच कामगारांचे नेतृत्व उदयाला आले पाहिजे हे भान मामा वरेरकरांनी ठेवले. बाबा शिवगण हा जन्माने, मनाने आणि व्यवसायाने कामगार आहे. खऱ्या अर्थाने तो मराठी साहित्यातील पहिला साम्यवादी कामगार पुढारी. त्याच्यी शिष्या बिजली ही लढाऊ क्रांतीकारी कामगार महिला आणि आपली वर्गीय जाणीव विसरून कामगारांच्या जीवनाशी, त्यांच्या समदुःखाशी त्यांच्या संघर्षाशी एकरूप होऊ पाहणारी विठू कृष्णा हे चित्र पुढे वरेरकरांच्या इतर कादंबऱ्यातही दिसत नाही. कारण त्यांचा कल गांधीवादाकडे झुकला. महात्मा गांधीनी विश्वस्ताची कल्पना मांडली आणि श्रमजीवी वर्गाचे भवितत्वय विश्वस्तांच्या हाती सुरक्षित राहील. असे प्रतिपादन केले. साम्यवादाने वर्ग संघर्षाला धार दिली. गांधीवादाने ती धार बोथट केली.

ग.त्र्य. माडखोलकरांनी 1933 ते 1960 च्या दरम्यान अनेक कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या कादंबऱ्यावर साम्यवादाचा प्रभाव आहे. आणि माडखोलकर गांधीवाद विरोधी असल्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यात साम्यवाद ठळक होऊ लागला.

स्वतःच्या इच्छेच्या आणि मनाच्या बळावर दुसरा निसर्ग निर्माण करण्याच्या मानवाच्या प्रयत्नांची फलश्रुती म्हणजे संस्कृती असे म्हटले जाते. तीन माणसे 'संस्कृती' घडवतात. शास्त्रज्ञ, कलावंत व कामगार असे थोर कामगार वर्गीय लेखक मॅक्झीम मॉर्की आपल्या एका लेखात म्हणतात तेच खरेच आहे.

मराठीतील कामगार साहित्याचे स्वरूप काय आहे. या प्रश्नापेक्षाही काळाची गरज म्हणून कोणत्या प्रकारचे कामगार साहित्य निर्माण व्हायला हवे हा प्रश्न महत्वाचा आहे. या प्रश्नांची कामगार साहित्यिकांनी, शासकीय साहित्य संमेलनाने गंभीरपणे दखल घेतली पाहिजे आणि शेवटी प्रखरपणे जाणीव होते की, कामगार साहित्याच्या निर्मितीला केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर एकूण भारतीय साहित्याच्या व भारतीय कामगार वर्गाच्या आणि

परिवर्तनवादी आंदोलनाच्या इतिहासात अपूर्व असे स्थान आहे.

मित्रहो! हे सांगण्यासाठी आपणापाशी अंतःकरणाच्या तळघरात कितीतरी अनुभवाचे जिवंत झरे उपलब्ध आहेत. त्यांना साहित्य व कलांच्या रूपाने मोकळे करू या. आपल्या संकट भोवताली कितीतरी वैविध्यपूर्ण जीवन पसरलेले आहे. त्यातील सुख दुःखांना, खऱ्या मानवी संबंधांना वास्तववादी व अर्थपूर्ण घटनांना व त्यातील जिवंत मानवी संवेदनांना कलारूप देऊ या. कविवर्य नारायण सुर्वे यांच्या शब्दांत सांगायचे झाल्यास.

*'यंत्राच्या काळजातील आर्त स्वर*
*तुझ्या कंठात आकार घेऊ दे*
*उडणाऱ्या नाडीचे जागते ठोके*
*त्यांचा घंटारव अंतरातं घुमू दे....'*

**संदर्भ :**

1. *डॉ. गो.नि.हडप – कामगार विश्व दशा आणि दिशा – रसिकराज प्रकाशन, नागपूर 2005*
2. *कवी नारायण सुर्वे – सनद, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, तृतीय आवृत्ती,*
3. *कवी नारायण सुर्वे – जाहीरनामा, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई*
4. *कवी नारायण सुर्वे – अध्यक्षीय भाषण, पहिले राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलन, पुणे 1992*
5. *अतिथी संपादकीय – दैनिक जनवाद रविवारीय साहित्य पुरवणी 30 एप्रिल 1995*

# संपादक मंडळ

## कार्यकारी संपादक

**डॉ. डी. व्ही. नाईक**
प्राचार्य
डॉ. एम. के. उमाठे महाविद्यालय
नागपूर

**डॉ. डी. आर. सातपुते**
प्राचार्य
प्रिन्सिपल अरूणराव कलोडे महाविद्यालय
नागपूर

**डॉ. गजानन पाटील**
प्राचार्य
स्व. अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय
नागपूर

**डॉ. प्रवीण चरडे**
प्राचार्य
सेवादल महिला महाविद्यालय
नागपूर

## संपादक

**डॉ. प्रीती उमाठे**
मराठी विभागप्रमुख
डॉ. एम. के. उमाठे कॉलेज
नागपूर

**डॉ. मनोहर नाईक**
मराठी विभागप्रमुख
प्रिन्सिपल अरुणराव कलोडे महाविद्यालय
नागपूर

**डॉ. सुशील मेश्राम**
मराठी विभागप्रमुख
सेवादल महिला महाविद्यालय
नागपूर

**डॉ. भगवान नन्नावरे**
मराठी विभागप्रमुख
स्व. अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय
नागपूर

## सह-संपादक

**डॉ. सोपानदेव पिसे**
सहयोगी प्राध्यापक
सेवादल महिला महाविद्यालय
नागपुर

**प्रा. संजय गोहणे**
सहाय्यक प्राध्यापक
स्व. अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय
नागपूर

**डॉ. संगीता खुरद**
सहाय्यक प्राध्यापक
स्व. अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय
नागपूर

**प्रा. आस्तिक गोवारकर**
डॉ. एम. के. उमाठे कॉलेज
नागपूर

**डॉ. प्रमोद लेंडे**
डॉ. एम. के. उमाठे कॉलेज
नागपूर



**The Editors or Publisher do not assume responsibility for the opinions expressed by the authors of the papers**



**Published by**
**Research Journal Publication Committee**
**Dr. M. K. Umathe College**
(Arts, Science & Ramchandrarao Mokhare Commerce College)
Lokseva Nagar, Bhamti, Ring Road, Nagpur-440022.
**Phone No.** 0712-2227062, 09421537123, **Email Id:** knowledgeresonancengp@gmail.com
**Website-** http://knowledgeresonance.com

**Printed by**
**Dinesh Graphic**
Shop No.3, 54-G, Vishnu Apartment, Trimurti Nagar, Nagpur-440 022 **M.** 9422119631